# Sant Gadge Baba Amravati University, Amravati

NAAC Accredited with "A"Grade

# ACE

(Academic, Co-curricular & Extra-curricular Activities of Students)

Volume 1 | Sant Gadge Baba Amravati University Bulletin | Issue - 2nd, Dec. 2017


## ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कृष्णा सोबती यांचे अभिनंदन !



भारतीय स्तरावर साहित्य क्षेत्रात सर्वोच्च मानला जाणारा 'ज्ञानपीठ' पुरस्कार यावर्षी हिंदी लेखिका कृष्णा सोबती यांना प्राप्त झाला. त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन ! हिंदी साहित्यातील कथात्म व निबंध लेखन क्षेत्रात त्यांचे कार्य मागील सहा दशकांपासून अविरत सुरू आहे. हिंदी,उर्दू,पंजाबी व राजस्थानी या चार भाषांनी प्रभावित त्यांची हिंदी भाषा अतिशय रसरशीत आहे. तिच्यात प्रमाण आणि बोलींचा सुंदर मिलाफ आपल्याला दिसून येतो. स्पष्ट व निर्भीड असणाऱ्या त्यांच्या लेखणीतून लोभसवाणा निसर्ग, ग्रामीण जीवन, स्त्रियांचे अस्तित्वभान, स्त्री-पुरुष संबंधांचे विविध भावपदर यांसारखे विषय प्रखरतेने व्यक्त झाले आहेत. त्यांचे साहित्य हे माणसा-माणसातील प्रेम, जिव्हाळा, वात्सल्य आणि करुणाभाव जागृत करणारे अस्सल भारतीय आहे. त्यांच्या 'डार से बिछुडी', 'सुरजमुखी अँधेरे के', 'ऐ लडकी', 'तिन पहाड', 'मित्रो मरजानी' इ.साहित्य प्रकाशित झालेले आहे. त्यांच्या 'जिंदगीनामा' या पुस्तकाला १९८० चा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाला होता. ज्ञानपीठ पुरस्कारापूर्वी त्यांना अनेक महत्त्वाच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे. ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे पुन:श्च अभिनंदन !

## मा. कुलगुरूंचे मनोगत



विद्यापीठ आणि विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमांवर आधारित व अभ्यासेतर उपक्रमात त्यांनी मिळवलेल्या नैपुण्याला अधोरेखित करणारे 'ACE' हे विद्यापीठ वार्तापत्र आहे. त्याचा हा दुसरा अंक प्रकाशित होताना मला मनस्वी आनंद होत आहे.

शिक्षक, विद्यार्थी, संशोधक आणि शिक्षकेतर कर्मचारी सातत्याने अध्ययन-अध्यापन, संशोधन याद्वारे ज्ञानाचा विकास करण्यासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीतीने प्रयत्न करीत असतात. त्यांचे हे प्रयत्न आपल्या सामाजिक बांधिलकीच्या दिशेने अपेक्षित वाटचाल करणारे ठरतात. आपले विद्यापीठ त्यादृष्टीने सातत्याने प्रयत्नरत आहे.

वर्तमान भारतीय समाजात अनेक समस्या भीषण रूप धारण करीत आहेत. आरोग्याबाबत प्रतिकूल वातावरण, पर्यावरणाचा ऱ्हास, सांप्रदायिकतेची वाढ, वैचारिक-भावनिक समायोजनाचा अभाव अशा विविध समस्यांनी आमचा सभोवताल वेढून आहे. अशा वेळी समाजातील एक जबाबदार घटक म्हणून आपली सर्वांची संवेदनशीलता तीव्र होत जाणे गरजेचे आहे. विद्यापीठे आणि महाविद्यालये हे बुद्धिजीवी वर्गाचे केंद्रस्थान राहिले आहे. त्यातील अध्यापन, अध्ययन आणि संशोधन हे समाजाभिमुख असणे आवश्यक आहे. या दृष्टीने आपल्यातील प्रत्येकाने चिंतनशील होणे गरजेचे आहे. त्यातून प्रत्येकाने आपल्या क्षमतेनुसार समाजातील समस्या संपुष्टात आणण्यासाठी उभे झाले पाहिजे.

अलीकडच्या काळात केवळ पुस्तकी ज्ञानाचे आदान-प्रदान आणि कोरडे सिद्धांत-संकल्पनांची मांडामांड अशीच काहीशी विद्यापीठांची बनलेली प्रतिमा बदलणे हे आपल्या हातात आहे. त्यादृष्टीने विद्यापीठातील शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालये यांमधील शिक्षक व विद्यार्थ्यांनी समाजउपकारक उपक्रम राबवावे आणि त्याविषयीची माहिती 'ACE' कडे पाठवावी.

आपल्या विद्यापीठाला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळवून देण्यासाठी तसेच व्यक्तिगत, कौटुंबिक आणि सामाजिक उत्कर्ष प्राप्त करणारे नव्या युगाचे समर्थ नागरिक म्हणून विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी आपण सर्व कटिबद्ध होऊ या.

डॉ.मुरलीधर चांदेकर

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

## संपादकीय

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या वतीने मा. कुलगुरुंच्या प्रेरणेने २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून 'ACE' हे वार्तापत्र प्रकाशित करण्यात येते आहे. विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागात आणि संलग्नित महाविद्यालयात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमांमध्ये प्राप्त केलेल्या यशाची दखल घेऊन त्यांच्या कार्याचे कौतुक करण्यासाठी व त्यांचा उत्साह द्विगुणित करण्यासाठी 'ACE' या वार्तापत्राची निर्मिती करण्यात आलेली आहे.

'ACE' च्या पहिल्या प्रकाशित अंकाला आपण दिलेल्या भरभरून प्रतिसादाने व पसंतीने मी भारावून गेलो आहे. याकरिता मी मा. कुलगुरू महोदय, सर्व शिक्षक व विद्यार्थी तसेच संपादक मंडळाचे मनापासून आभार व्यक्त करतो. 'ACE' चा दुसरा अंक २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात प्रकाशित होतो आहे. मला विश्वास आहे की हा अंक देखील वाचनीय, दर्जेदार व संग्राह्य होईल.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठासाठी अत्यंत अभिमानाची बाब म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यापीठात व महाविद्यालयांमध्ये नियुक्त होणारे शिक्षक व इतर शैक्षणिक पदांकरिता आवश्यक किमान शैक्षणिक अर्हता व उच्च शिक्षणामधील दर्जा राखण्यासाठी करावयाच्या आवश्यक उपाययोजना यांवर प्रास्तावित विनियमांकरिता शिफारशी करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने राष्ट्रीय स्तरावर गठित केलेल्या समितीमध्ये आपल्या विद्यापीठाचे सन्मा. कुलगुरू डॉ.मुरलीधर चांदेकर यांची सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. मी मा. कुलगुरू महोदयांचे संपादक मंडळाच्या वतीने मन:पूर्वक अभिनंदन करतो.

'ACE' अंकातून विद्यार्थ्यांची शैक्षणिक कामगिरी व गुणवत्ता, विद्यार्थ्यांचे सामाजिक योगदान,विद्यार्थ्यांनी खेळ व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये मिळविलेले प्राविण्य इ. विविध बाबींना व त्यांच्या बहुविध प्रतिभेला खरोखर जिवंत केले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे दस्तऐवज म्हणजे हे वार्तापत्र होय. आपल्या सहकार्याशिवाय ते पूर्णत्वास जाऊ शकत नाही. या करिता मी आपले मनापासून आभार व्यक्त करतो. प्रकाशित होणाऱ्या या अंकामध्ये आपणास काही सुधारणा अथवा बदल सुचवायचे असल्यास आपण आपल्या विभागप्रमुख वा प्राचार्य/संस्थाप्रमुखांच्या शिफारशीद्वारे आमच्याकडे पाठवाव्यात. तसेच त्याची एक प्रत आपल्या जिल्ह्यातील समिती प्रमुखाकडेसुद्धा अग्रेषित करावी, अशी आपणास नम्र विनंती आहे. आपण केलेल्या सहकार्याबद्दल पुन:श्च आपले आभार मानतो. आपले सहकार्य मिळावे, ही अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद.

डॉ. एस. एफ. आर. खाद्री

मुख्य संपादक 'ACE'

## मराठी विभागाच्या केशवसुत काव्यस्पर्धेचे चौथे वर्ष

विद्यापीठाच्या मराठी विभागाकडून दरवर्षी कवी केशवसुत काव्यस्पर्धेचे आयोजन केले जाते. ११ सप्टेंबर, २०१७ रोजी झालेल्या स्पर्धेचे हे सलग चौथे वर्ष होते. महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांमध्ये काव्यलेखनाची गोडी वाढावी आणि काव्यलेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने ही स्पर्धा सुरू करण्यात आली. या स्पर्धेत यावर्षी एकून ७६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ आणि अमरावती या पाचही जिल्ह्यांतून हे विद्यार्थी आले. या स्पर्धेत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान विभागाच्या श्रद्धा किशोर गर्दे हिने प्रथम, श्री. शिवाजी महाविद्यालयाचा (अकोला) विशाल लक्ष्मण नंदागवळी हा द्वितीय तर ब्रिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालयाचा (अमरावती) प्रतीक सुरेशराव चिमणकर याने तृतीय क्रमांक पटकावला. विद्यापीठाचे मा. प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर आणि कलाशाखेचे अधिष्ठाता डॉ. मनोज तायडे यांच्या हस्ते विजेत्यांना प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह आणि रोख बक्षिस देऊन गौरविण्यात आले. डॉ. पंकज वानखडे आणि डॉ. भूमिका वानखडे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. स्पर्धा प्रभारी म्हणून डॉ. हेमंत खडके यांनी जबाबदारी सांभाळली.







## उपयोजित कौशल्य विकास वर्ग



विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या विविध विभागांतील विद्यार्थ्यांसाठी उपयोजित कौशल्य विकासाचे वर्ग सलग दुसऱ्या वर्षीही यशस्वीपणे घेण्यात आले. या वर्गासाठी २०१७-२०१८ या सत्रात (१ ते ११ फेब्रुवारी २०१७) एकूण १०५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. भाषण कौशल्य, सूत्रसंचालन, स्पोकन इंग्लीश, गटचर्चा, मुलाखात तंत्र अशा पाच विषयांना विद्यार्थ्यांनी प्राधान्य दिले. डॉ. नदिम खान, डॉ. वर्षा देशमुख, डॉ. मोना चिमोटे, डॉ. वर्षा नाठार, डॉ. संदीप जोशी, डॉ. किशोर फुले, डॉ. हेमंत खडके, डॉ. शीतल तायडे, प्रा. ज्ञानेश्वर गटकर, डॉ. क्षितीज पाटणकर, श्री. नितीन भट, श्री. पवन नालट, श्रीमती क्षिप्रा मानकर या तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या वर्गांमध्ये विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिक करून घेण्यावर भर दिला. या उपक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. हेमंत खडके यांनी जबाबदारी सांभाळली.





## हार्दिक अभिनंदन!

**महाराष्ट्र शासनाकडून सन्मा. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांची कार्यबल गटाच्या अध्यक्षपदी निवड.**

महाराष्ट्र शासनाने प्रत्येक जिल्ह्यातील एकमेव विद्याशाखा/महाविद्यालय अनुदान तत्त्वावर आणण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला असून त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यबल गटाची स्थापना करण्यात आली आहे. या कार्यबल गट समितीच्या अध्यक्षपदी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने २ डिसेंबर २०१७ च्या शासन निर्णयान्वये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांची अध्यक्षपदी निवड केली आहे. अल्पावधीतच आपले ज्ञान, कार्यक्षमता, प्रशासकीय कौशल्य व निर्णयक्षमता याची चुणुक दाखवून विद्यार्थी व विद्यापीठाच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय त्यांनी घेतले आहेत. त्यांच्या कार्याचा सन्मान म्हणून शासनाने त्यांची या महत्त्वपूर्ण समितीवर अध्यक्षपदी निवड केली आहे.

मा. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी कुलगुरू म्हणून विद्यापीठाच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. जवळपास वीस वर्षानंतर या विद्यापीठात पाच नवीन पदव्युत्तर विभाग त्यांच्या कार्यकाळात सुरू झालेत. कौशल्यावर आधारित अनेक अभ्यासक्रम त्यांनी सुरू केलेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना रोजगार मिळण्यासाठी आता मार्ग प्रशस्त होत आहे. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी अनेक योजना सुरू केल्यात. त्यामध्ये संत गाडगे बाबा शुद्ध पेयजल योजना, संत गाडगे बाबा विद्यार्थीनी बस पास योजना, संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण योजना, संत गाडगे बाबा कमवा व शिका योजना इ. योजनांचा समावेश आहे.

तसेच मा. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी शासकीय प्रथम श्रेणी महाविद्यालय, बंगारपेठ, कर्नाटकाच्या राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रत्यायन परिषदेच्या गठित सुकाणू समितीचे अध्यक्ष म्हणूनही यशस्वीरित्या कार्य केले.

## Practical Development of Leadership Qualities Opportunities in Youth Hostel Association

His team, which proudly represented the State, produced Powerpoint Presentation on 'Yoga Activities & its Importance'. Drama on the theme of "Unity in Diversity", Folk Dance with songs and other cultural events which are highly appreciated by the audience. The convention has greatly helped the students in self development along with fostering in them a sense of National Pride. Youth Hostel Association is an International Organization which is 110 years old and which is working in the area of Adventure Sports like Trekking, Mountaineering, River Rafting, Rock Climbing, leadership development etc. At present, the network of Youth Hostel Association has spread over in more than 90 countries having its own 4500 hostels of its own. It ensures standard accomodation & food at affordable, reasonable prices.




**Vedant Atul Bharadwaj**, a first year student of M.B.A. Department of the University was selected along with six other members from various other Colleges/ University across the State to represent Maharashtra for participation in the 'National Youth Convention - 2017' at Mysuru (Karnataka) organized by the Youth Hostel Association of India. The program was conducted both at Mysuru and Bengaluru from 11th September to 19th September 2017. Candidates were provided various topics like Global Warming, Women Empowerment, Ethics and Moral Value etc. The main theme of the programme was 'Unity in Diversity'. Along with this, different types of cultural activities were also organized in this festival like Drama, Songs, Common Flash Mob Dance, March Past & State representation etc. Vedant Bharadwaj successfully participated in all the activities performed on as well as off the Dias.



धरती, पाणी, हवा, ठेवा साफ नाहीतर
येणारी पिढी करणार नाही माफ.

## Co-curricular Activities in the English Department :

Like every year, the University English Department, has successfully organized a 7-day Spoken English Programme for the campus students. The said programme, under the Applied Skill Activity, was conducted from 18th September to 28th September 2017 in the English Department. Eminent faculty along with faculty members from the Department enlightened the participants with the importance of the spoken English Skills and about various strategies to acquire those skills. The course received huge response and positive feedback from the participants. The Department expresses gratitude to the patron Dr. Murlidhar Chandekar Hon. Vice-Chancellor of the University and to the Convenor of Applied Skills Development Committee, Dr. Hemant Khadke.



Dr. Sandeep Joshi teaching the technique

Also, students of the English Department enlisted their participation in the Youth Festival 2017 organized at Raisoni College of Engineering, Amravati. The student presented before the audience a skit titled 'Women Versus Men' which received great applause and appreciation from the audience. Under the social awareness activity, the students of the English department participated in the Blood Donation Programme arranged in the Chemical Technology Department of the University.

### कन्याकुमारी येथे स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीची अभ्यास सहल

स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या वतीने नुकतेच स्वामी विवेकानंद शिला स्मारक, कन्याकुमारी येथे अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. सदर सहलीच्या अनुषंगाने सहभागी विद्यार्थ्यांनी सहलीमध्ये सहभागी झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. सहलीकरिता स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती चे समन्वयक डॉ. एस. के. ओमनवार व सल्लागार समितीचे सदस्य डॉ. डी. जी. वाकडे यांनी मार्गदर्शन केले. सदर सहलीचे समन्वयक म्हणून प्रा. श्रीकांत रासेकर (यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, मंगरुळपीर) यांनी जबाबदारी पार पाडली.

स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्राच्या वतीने दिनांक १६ जानेवारी २०१७ ते २४ जानेवारी २०१७ या कालावधी मध्ये विद्यापीठाच्या संलग्नीत पाचही जिल्ह्यामध्ये युवा शिबिराचे व विविध युवा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच या व्यतिरिक्त एक युवा शिबिर श्री रामकृष्ण विवेकानंद समिती, अमरावती येथे घेण्यात आले होते. युवा शिबिराला अंदाजे २७०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

# WORKSHOP

## Brijlal Biyani Science College, Amravati

### ONE DAY WORKSHOP ON NEW INNOVATIVE IDEAS FOR SCIENCE GRADUATES, POST GRADUATES & RESEARCHERS UNDER START-UP PROGRAM (I-SWITCH 2017)

The P.G.Department of Electronics of Brijlal Biyani Science College, Amravati and MIT-Technology Business Incubation Center, Pune and MEDA, Pune have jointly organized "One day Workshop on New Innovative Ideas for Science Graduates, Post Graduates & Researchers under start-up program (I-switch 2017)" on Saturday, the 5th August 2017.


Welcome to chief guest and all guest of honour

Initially Dr. D. S. Dhote, Convenor of the program gave introductory speech. He introduced all the guests and eminent personalities for the program and also gave idea behind organizing this workshop. He explained what is MIT-TBI, MEDA and all the related aspects with this workshop in his speech.

Dr. R. S. Jaipurkar Pro-Vice Chancellor of Sant Gadge Baba Amravati University, the Chief guest inaugurated the workshop. He appreciated all the efforts taken by the PG Department of Electronics with MIT-TBI and MEDA. He also shared his research experience in the field of Apiculture at Chikhaldara. Dr. Jaipurkar also motivated the students and researchers to take part in nation building activities. He gave surety on the behalf of Hon'ble Vice Chancellor of Sant Gadge Baba Amravati, University that, University will always welcome such activities that really enhance students interest in the research field. He also requested all the Heads and Principals from different High School and Colleges to take benefit of ATAL tinkering Lab.


Dr. R.S.Jaipurkar giving inaugural speech


Inaugural function - One Day Workshop

### Guest lecture on "X-ray Technique and Diploma in Radiotherapy at Bhabha Atomic Research Centre (BARC) and Tata Memorial Hospital (TMH)"

The Department of Electronics of Brijlal Biyani Science College, Amravati has organized guest lecture on "X-Ray technique and Diploma in Radiotherapy at Bhabha Atomic Research Centre (BARC) and Tata Memorial Hospital (TMH) Mumbai" for M.Sc., P.G.D.B.M.E. & B.Sc. students on 19th August 2017 in Electronics Laboratory. For this session, Dr.R.A.Kinhikar (Assistant Professor & Radiotherapist of TMH Mumbai) was the chief guest and delivered lecture on the above mentioned topic.


Dr. R. A. Kinhikar delivering his guest lecture

## Dr. Panjabrao Deshmukh College of Law, Amravati.

1st Prize at "Auro National Meet" Court, Surat.
[5-7 March, 2017]
1. Shri. Anand Thakare
2. Ms. Pallavi Ukesh
3. Ms. Payal Kaware
Best Speaker 1st Prize - Shri. Anand Thakare



1st Prize at National Meet Trial Nashik
(20-22 Jan., 2017)
1. Ms. Nikita Pachade
2. Shri. Gaurav Taral
3. Shri. Shreyas Hingmire





1st Prize at "National PowerPoint Presentation", Aurangabad.
(Dt.5/2/2017)
Ms. Nikita Pachade





## रूसा (राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान) अंतर्गत 'रिसोर्स सेंटर फार इन्कुजीव्ह एज्युकेशन, श्री शिवाजी महाविद्यालय, अकोला

विदर्भातील पहिल्या ब्रेल व टॉकिंग बुक्स ग्रंथालयाचे उद्घाटन संपन्न.



कृषिकीर्तनकार श्री. महादेवरावजी भुईभार ग्रंथालयाचे उद्घाटन करताना



अंध विद्यार्थी ब्रेलबुक्स चे वाचन करताना

नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाईंड, युनिट महाराष्ट्र, नॅब जिल्हा शाखा, अकोला व श्री शिवाजी महाविद्यालय, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीच्या अंतर्गत अंध विद्यार्थ्यांसाठी पहिली ब्रेलबुक्स व टॉकिंग बुक्स लायब्ररी २३ जुलै, २०१७ रोजी सुरू करण्यात आली.



ब्रेलबुक्स व टॉकिंग बुक्स लायब्ररी चे उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवर

या ग्रंथालयाच्या उद्घाटन कार्यक्रमास नॅब युनिट महाराष्ट्राचे सहसचिव, श्री. मुक्तेश्वर मुनशेट्टीवार, चेअरमॅन ब्रेल लायब्ररी, नॅब महाराष्ट्रचे श्री. शाम पाडेकर, अम्वे अपॉच्युनिटीस्चे श्री. शांतारामजी, नॅब जिल्हा शाखा, डॉ. अविनाश पाटील, सचिव श्री. राम शेगोकार, संचालक प्रा. विशाल कोरडे, ॲड नितीन गवळी, डॉ. अनंत शेवाळे, श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष भडांगे, कृषिकीर्तनकार श्री. महादेवरावजी भुईभार, डॉ. आशिष राऊत, उपप्राचार्य, डॉ. एस. पी. देशमुख, आमदार श्री. गोवर्धनजी शर्मा, आमदार, श्री रणधीरजी सावरकर, रा.से.यो. जिल्हा समन्वयक प्रा. विवके हिवरे व महाविद्यालयातील कर्मचारी तसेच दिव्यांग विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. अमरावती विद्यापीठातील पहिले ग्रंथालय जे दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कार्य करीत आहे. या ग्रंथालयात ब्रेलबुक्स व टॉकिंग बुक्स विद्यार्थ्यांसाठी नि:शुल्क उपलब्ध करून देण्यात आले आहेत.




## Shri Shivaji Arts, Commerce College, Amravati

Name of Program: Braille Library For Visually Disabled with the assistance from National Blind Association

Date of Program : 12th August, 2017



Library having facility of Talking Books, Braille Literature and JAWS software for visually disabled students.

## श्रीमती एल.आर.टी. वाणिज्य महाविद्यालय, अकोला.



दि. ०१/०६/ २०१७ ते १०/०६/२०१७ या कालावधीत महाविद्यालयातील रासेयोचे ०५ विद्यार्थी व रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. आर.एल. येऊल यांनी राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन 'आव्हान' शिबिर, कोल्हापूर येथे सहभागी होऊन आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घेतले.



दि. १६/०८/२०१७ ते २०/०८/२०१७ या कालावधीत महाविद्यालयातील कु. वैष्णवी अशोक हिस्सल हिने राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव द्वारे आयोजित राज्यस्तरीय नेतृत्व प्रशिक्षण शिबीर 'प्रेरणा – २०१७' मध्ये सक्रीय सहभाग घेतला.



दि. २०/१०/ २०१७ ते २९/१०/२०१७ या कालावधीत हैदराबाद, तेलंगणा येथे होऊ घातलेल्या पश्चिम विभागीय रासेयो पूर्व राष्ट्रीय प्रजासत्ताक दिनाकरिता महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक नितीन राजूसिंग सोळंके याची निवड झाली.

दिनांक १०/०८/२०१७ व ०२/१०/२०१७ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. जी. चापके यांच्या मार्गदर्शनात व रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. आर. एल. येऊल व प्रा. डॉ. एन. एन. चोटिया यांच्या नेतृत्वात रासेयो स्वयंसेवकांद्वारे बॅनर्स व हँडआउट्स या साधनांचा वापर करून अकोला शहरातील मुख्य रस्ते स्वच्छ करून संदेश रॅलीद्वारे स्वच्छते विषयी जनजागृती करण्यात आली. यानंतर रासेयो स्वयंसेवकांद्वारे अकोला बसस्थानक परिसर स्वच्छ करून कचरा व प्लॅस्टीक निर्मूलन करण्यात आले. यावेळी अकोला मध्यवर्ती बस आगाराचे व्यवस्थापक मा. श्री. अरविंद पिसोळे यांनी स्वच्छतेविषयी मार्गदर्शन केले.



बसस्थानक परिसराची स्वच्छता करताना प्राचार्य, प्राध्यापक गण व रासेयो स्वयंसेवक

# STUDENTS ACHIEVEMENTS

## Sipna College of Engineering and Technology, Amravati.

1) **International Space University (ISU) Kalpana Chawla Scholarship** awarded to **Ms. Sonal Baberwal** Final Year EXTC.



ISU Kalpana Chawla Scholarship awarded to SSP17 Sonal Baberwal

2) **Transform Maharashtra -** participation of **Mr. Sagar Munde** Final Year IT , Date 1st May 2017 .

3) **Mr. Abhishek Donge** Second Year IT - Got Best seller award of the week from Notion Press for his book **"Inteha".** On Akola Akashwani in 'Ugwate Kalakar' programme in his interview he informed how he was inspired about poetry writing.




4) NPTL Online Certification on **"Internet Work Security"** - **Mr. Dhiraj Ramteke** Final Year - IT

5) **National Level Internship -** Participation of **Shri. Pratik Kale** First Year - IT.
Date-1st June 2017 to 14th July 2017, NITI Aayog, Government of India, Parliament Street, New Delhi.

## R.A ARTS, SHRI. M.K COMMERCE & SHRI S.R. RATHI SCIENCE MAHAVIDYALAYA, WASHIM

### A month on bicycle

*Everyone wants to do something adventurous in life and here we are, we did it!*



Felicitated by Hon. Shri. Nitin Gadkari

Gaurang Shekhar Naik, 20 years and Abhishek Raju Vyawahre, 20 years both from R. A. College, Washim did an adventurous ride from Kanyakumari to Khardungga top covering 14 States of India and 4700 kms in India.






## Shri Vyankatesh Arts, Commerce and Science College, Deulgaon Raja, Dist. Buldana.

| Sr. No | Name of the student/s | Class | Nature of Achievement | Name of Activity/Event | Date |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Ku. Manisha Sudhir Mhaske | B.Sc.I | Second Prize of Rs. 10000/- | Essay Competition organized by Z.P.Buldana at district level. | 12/09/2017 |
| 2 | Mr. Muralidhar Mhaske | B.A.III | Consolation Prize of Rs. 1000/- | State Level Quiz Competition organized by Pratap College Amalner, Dist. Jalgaon. | 05/09/2017 |
| 3 | Mr.Sachin Sangale | B.A.III | Consolation Prize of Rs. 1000/- | State Level Quiz Competition organized by Pratap College Amalner, Dist. Jalgaon. | 05/09/2017 |



Ku. Manisha S. Mhaske



Mr. Murlidhar Mhaske & Mr. Sachin Sangale receiving trophy at the hands of chief guest

## Jawaharlal Darda Institute of Engineering & Technology, Yavatmal.

Rahul Tapke, Final Year, Chemical Engineering received Excellent Paper Award in International Conference IIER, Pattaya, Thailand on 10th – 11th July 2017. Paper Entitled "Zero Budget Natural Reforming with the help of Cow Dung and Cow Urine".

## Matoshree Vimalabai Deshmukh Mahavidyalaya, Amravati

Bhartiya Sanskruti Pariksha on Leadership Development Organized by Vivekanand Center, Kanyakumari (Maharashtra Region) held on 17.09.2017.



Vaibhav Bhaskarrao Thakare (B.Sc. II) Stood Second in order of merit.

## Dhamangaon Education Society College of Engineering, Dhamangaon Rly.

- Mr. Rahul Pataliya presented paper entitled "Automative Electrostatic Precipitator" in D-Techfest -2017, A National Level Technical Event organised by Suresh Deshmukh College of Engineering, Selukate, Wardha on 21st February 2017 and won First Prize.
- श्री. गौरव व्ही. वानखडे यांनी विद्याभारती महाविद्यालय, अमरावती द्वारा दि. २०-०९-२०१७ रोजी आयोजित राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेमध्ये भाग घेऊन तृतीय पुरस्कार प्राप्त केला.

# STUDENTS' ACHIEVEMENTS IN SPORTS

## विद्यापीठ युवा महोत्सव चमूची आंतरविद्यापीठ स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी ! चमूचा मा.कुलगुरुंच्या हस्ते सत्कार

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या युवा महोत्सव चमूने ए.आय.सी.ई.सी.टी. विद्यापीठ, भोपाळ येथे नुकत्याच संपन्न झालेल्या मध्य विभाग आंतर विद्यापीठ युवा महोत्सव स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तूरा रोवून विद्यापीठाचा नावलौकिक देशभर उंचावला. चमूत सहभागी सर्व यशस्वी स्पर्धकांचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर व प्र–कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर यांनी अभिनंदन केले. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. अविनाश असनारे, महिला महा., अमरावतीच्या डॉ.जयश्री एम.वैष्णव व श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोल्याचे श्री. हर्षवर्धन मानकर उपस्थित होते.

शास्त्रीय गायन स्पर्धेमध्ये शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावतीचा श्री.मुकुंद सूर्यवंशी याने द्वितीय स्थान प्राप्त केले.

भारतीय समुहगान स्पर्धेमध्ये श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथील कु. पूर्वा देशमुख, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील कु. अंबिका ठाकरे, महिला महाविद्यालय, अमरावती येथील कु. अनुजा अपस्तंभ, प्रो.राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड रिसर्च, बडनेरा रेल्वे येथील श्री.अथर्व अंबुलकर, कला व वाणिज्य महाविद्यालय, किरण नगर, अमरावती येथील कु. मौसमी महेशकर, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथील श्री.मुकुंद सूर्यवंशी तसेच श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथील श्री. हर्षवर्धन मानकर व श्री.आनंद बोराटणे, अमरावती येथील श्री.प्रशांत ठाकरे हे साथीदार होते. या चमूने प्रथम स्थान प्राप्त केले.

पाश्चिमात्य समुहगान स्पर्धेमध्ये श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील कु. अंबिका ठाकरे, महिला महाविद्यालय, अमरावती येथील कु. अनुजा अपस्तंभ, प्रो.राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड रिसर्च, बडनेरा रेल्वे येथील श्री.अथर्व अंबुलकर, कला व वाणिज्य महाविद्यालय, किरण नगर, अमरावती येथील कु. मौसमी महेशकर, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथील श्री. मुकुंद सूर्यवंशी, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती येथील जाबाज खान, तसेच साथीदार म्हणून अमरावती येथील श्री.अभिजित भावे व श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथील श्री.आनंद बोराटणे या चमूने तृतीय क्रमांक पटकाविला.

फोक आर्केस्ट्रॉ स्पर्धेमध्ये श्रीमती नानकीबाई वाधवाणी महाविद्यालय, यवतमाळ येथील श्री.आकाश सैतवाल, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथील कु. पूर्वा देशमुख व श्री.आनंद बोराटणे, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील कु. अंबिका ठाकरे, विद्याभारती महाविद्यालय, अमरावती येथील कु. मयुरी राऊत व कु. वैभवी बोडे, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथील श्री. मुकुंद सूर्यवंशी, वाय.डी.व्ही.डी. कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा येथील श्री.सागर भालचक्र, तसेच साथीदार म्हणून अमरावती येथील श्री.प्रशांत ठाकरे व श्री.अविनाश पाटील या चमूने प्रथम स्थान प्राप्त केले.

एकांकिका स्पर्धेमध्ये श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील श्री.अजय इंगळे व कु. वैष्णवी पंडित, विद्याभारती महाविद्यालय, अमरावती येथील श्री.श्रीलेश पांडे, भारतीय महाविद्यालय, अमरावती येथील श्री.तुषार घर्डेकर व श्री.अनुराग वानखडे, ब्रिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील श्री.सौरभ पातुर्डे, प्रो.राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड मॅनेजमेंट, बडनेरा रेल्वे येथील श्री. ऋषभ क्षीरसागर व कु. गौरी शेकोकार, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती येथील कु. सोनम पांडे, तसेच साथीदार म्हणून अमरावती येथील श्री. विशाल तराळ या चमूने द्वितीय स्थान प्राप्त केले.



मिमिक्री स्पर्धेमध्ये प्रो.राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड मॅनेजमेंट, बडनेरा रेल्वे येथील श्री.ऋषभ क्षीरसागर याने तृतीय, फाईन आर्ट (कोलाज) स्पर्धेमध्ये शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथील श्री.प्रतीक घाटोळ याने द्वितीय स्थान प्राप्त केले. विद्यापीठ चमूला सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त झाले असून संगीत व नाटक विभागाने प्रथम क्रमांक पटकाविला आहे, सर्वसाधारण उपविजेता सर्व कलाप्रकारांमध्ये ठरला आहे.

स्पर्धेकरिता चमू व्यवस्थापक म्हणून महिला महाविद्यालय, अमरावतीच्या डॉ. जयश्री एम. वैष्णव तर श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,अकोला येथील श्री.हर्षवर्धन मानकर यांनी काम पाहिले.

---

## महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव–२०१७

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी येथे दिनांक २७ नोव्हेंबर २०१७ ते ०१ डिसेंबर २०१७ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या २१ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव–२०१७ मध्ये खो–खो (महिला) स्पर्धेत कास्य पदक प्राप्त करणारा संघ.



संघ प्रशिक्षक प्रा. संतोष यावले, डॉ. सौ. कमलताई गवई अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, दारापूर, जि.अमरावती.

संघात सहभागी खेळाडूंची नावे :–

| | |
|---|---|
| १) क. समीक्षा सुरेश अमझारे | २) कु. स्वाती भिमराव लांजेवार |
| ३) कु. निलिमा बापुराव राऊत | ४) कु. अश्विनी श्रीपाद दंडे |
| ५) कु. कविता सुरेश शेंडे | ६) कु. काजल राजू दोनोडे |
| ७) कु. टिना संतोष धुरीया | ८) कु. शुभांगी रमेश माहोरे |
| ९) कु. किरण मारोती नक्षराळे | १०) कु. बबिता सुरेशराव शेंडे |
| ११) कु. पूजा काशीराम गुजर | १२) कु. चैताली किशोर हाडे |

---

पंजाब विद्यापीठ, चंदीगढ येथे दिनांक २३.११.२०१७ ते २८.११.२०१७ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बॉक्सींग (महिला) स्पर्धेत ८१ किलो पेक्षा अधिक वजन गटात कु. नेहा अरुणराव रोठे हिने सुवर्णपदक पदक प्राप्त केले.




संघ प्रशिक्षक डॉ. सिद्धार्थ जाधव,श्रीमती नानकीबाई वाधवानी महाविद्यालय, यवतमाळ व व्यवस्थापक डॉ. रश्मी गजरे, श्रीमती नानकीबाई वाधवानी महाविद्यालय, यवतमाळ.

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी येथे दिनांक २७ नोव्हेंबर २०१७ ते ०१ डिसेंबर २०१७ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या २१ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव-२०१७ मध्ये कबड्डी (महिला) स्पर्धेत कास्य पदक प्राप्त करणारा संघ.



संघ प्रशिक्षक डॉ. प्रा. सागर नारखेडे,सरस्वती महा.,दहिहांडा, जि. अकोला.

संघात सहभागी खेळाडूंची नावे :-

| | |
|---|---|
| १) कु . किरण सुरेश जरांगे | २) कु. समीक्षा सुरेश नाईकनवरे |
| ३) कु. बरखा दिनकर गेडाम | ४) कु. तेजस्विनी अनिल खंडारे |
| ५) कु. वैशाली अरूणपंत बोंडे | ६) कु. साक्षी धीरज देशमुख |
| ७) कु. मनीषा बंडू जाधव | ८) कु. रेवती दिनेशराव निकम |
| ९) कु. वैष्णवी सुनील बोके | १०) कु.मीनाक्षी विष्णूपंत बहुरूपी |
| ११) कु. दुर्गा राजू आंबेकर | १२) कु. पल्लवी विनोदराव टिकले |

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी येथे दिनांक २७ नोव्हेंबर २०१७ ते ०१ डिसेंबर २०१७ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या २१ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव-२०१७ मध्ये मैदानी स्पर्धा (पुरुष) स्पर्धेत श्री. किशोर जाधव यांनी ५००० मीटर धावण्याच्या स्पर्धेत कास्य पदक प्राप्त केले. संघ प्रशिक्षक प्रा. योगेश्वर निकस, रामराव झनक महाविद्यालय, मालेगाव, जि. वाशिम.



## भास्करराव शिंगणे महाविद्यालय, साखरखेर्डा

डिग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन, अमरावती येथे आयोजित आंतर महाविद्यालयीन Weight Lifting, Power Lifting स्पर्धेमध्ये स्व. भास्करराव शिंगणे कला, प्रा. नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालय, साखरखेर्डा येथील मोहन ज्ञानेश्वर वाघमारे बी.कॉम. भाग ३ चा विद्यार्थी याने सहभाग घेऊन उत्तम प्रदर्शन करत Weight Lifting या प्रकारात कास्य पदक मिळविले.



## लोकनायक बापुजी अणे महाविद्यालय, यवतमाळ

महाराष्ट्र शासनाचा जिल्हा क्रीडा पुरस्कार कु. नीलम राऊत बी.ए. भाग २ च्या विद्यार्थिनीला दिनांक १ मे २०१७ रोजी यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना.मदनभाऊ येरावार यांचे हस्ते जिल्हा क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सतत ४ वर्षे राष्ट्रीय खो-खो स्पर्धांमधून तिने विदर्भाचे प्रतिनिधीत्व केले आहे. त्याकरिता जिल्हा क्रीडा गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. मदनभाऊ येरावार कु.नीलम राऊत हिचा सन्मान करताना

## श्री नथमल गोयनका विधी महाविद्यालय, अकोला

सत्र २०१६-१७ मध्ये आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीच्या क्रिकेटसंघाने उत्कृष्ट कामगिरी केली असून, सदर स्पर्धेमध्ये विद्यापीठाच्या संघाने तिसरे स्थान पटकावले. या संघामध्ये श्री नथमल गोयनका विधी महाविद्यालय, अकोला येथील विधी भाग-२ (०३ वर्षीय अभ्यासक्रम) चा विद्यार्थी चैतन्य शशिकांत हिरपूरकर याने मोलाची कामगिरी करून महाविद्यालयाचे तसेच विद्यापीठाचे नाव गौरविले आहे.

महाराष्ट्र ह्युमन राईटस् कमिशन द्वारा आयोजित राज्यस्तरीय स्टुडंट इंटर्नशिप प्रोग्राम मध्ये सर्व राज्यांमधून आलेल्या विद्यार्थ्यांपैकी निवड झालेल्या ३० विद्यार्थी मध्ये श्री नथमल गोयनका विधी महाविद्यालया, अकोला येथील विद्यार्थी मोहम्मद राझा सरकार याची निवड झाली.

## Dr. Panjabrao Deshmukh College of Law, Amravati.

"Colour" in Lawn Tennis in West-Zone Inter University Tournament (2016-17)

Shri. Mohd. Mustafa Kazim



## Sipna College of Engineering and Technology, Amravati.

**Gold Medal in State Gymnastics Championship 2017-18**

**Rohit Devikar**

First Year EXTC




# EDITORIAL BOARD

*** Chief Editor***

**Dr. S.F.R. Khadri**

Director, IQAC

*** Editors***

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Dr.A.M.Asanare | Dr.Mrs.M.M Chimote | Dr.G.L.Gulhane | Dr. S.P. Joshi | Dr. Vilas Nandurkar |
| Dr. H.S. Lunge | Dr. Mahendra Mete | Shri. Vivek Hiware | Dr. Ashalata Raman | Prof. A.A. Nandgaonkar |
| Ms. J.S. Patil | Dr. Ajay B. Lad | Shri. Pravin Hamjade | Shri. S.S. Muley | Prof. G.R. Jadhao |



**Address For Correspondence :** Chief Editor, Sant Gadge Baba Amravati University Bulletin "ACE", Internal Quality Assurance Cell (IQAC), Sant Gadge Baba Amravati University, Amravati (M.S.)-444602 Tel. (0721) - 2660896 Mob.-9423425393, email:diriqac@sgbau.ac.in

**Published by : Dr. Ajay Deshmukh, Registrar, Sant Gadge Baba Amravati University, Amravati - 444602**